दैनिक
# यश सिद्धि न्यूज
RNI NO. MAHMAR/2023/84162
YASH SIDDHI NEWS
● वर्ष १ ले ● अंक २६९ वा ● सोमवार १९ फेब्रुवारी २०२४ ● पाने ४ ● किंमत ४ रु/-
| * Volume 1 | Issue 269 | Date : 19/02/2024 blow :Monday Page 4 Price 4




# अखेर कांद्यावरील निर्यातबंदी उठवली

## केंद्र सरकाचा मोठा निर्णय





नवी दिल्ली : केंद्र सरकारनं कांदा उत्पादक शेतकऱ्यांबाबत मोठा निर्णय घेतला आहे. सरकारनं कांद्याच्या निर्यातीवरील बंदी उठवली आहे. केंद्रीय गृहमंत्री अमित शाह यांच्या उपस्थितीत केंद्रीय मंत्री समितीची बैठक झाली आहे. या बैठकीत निर्णय घेण्यात आला. दरम्यान, सरकारनं जरी कांदा निर्यातील परवानगी दिली असली तरी, त्यावर मर्यादा ठेवण्यात आली आहे. ३ लाख मेट्रिक टन कांदा निर्यात करण्यास समितीनं परवानगी दिली आहे.

देशातील कांद्याच्या वाढत्या किंमती नियंत्रणात आणण्यासाठी सरकारने निर्यातबंदीचा निर्णय घेतला होता. ही निर्यात बंदी ३१ मार्च २०२४ पर्यंत होती. मात्र, सरकारनं त्याआधीच निर्यात बंदी उठवण्याचा निर्णय घेतला आहे.

यापूर्वीच्या अनेक अहवालांमध्ये केंद्र सरकार कांद्याच्या निर्यातीवरील बंदी हटवण्याचा विचार करत असल्याचे अपेक्षित होते. कांदा उत्पादक भागातील कांदा आणि इतर भाज्यांचे भाव कोसळणे हे त्याचे प्रमुख कारण असल्याचे सांगण्यात आले. आता केंद्रीय मंत्र्यांच्या समितीने बंदी उठवण्याचा निर्णय घेतला असून ३ लाख मेट्रिक टन कांद्याच्या निर्यातीला मान्यता दिली आहे. यासोबतच बांगलादेशमध्ये ५० हजार टन कांदा निर्यातीलाही मान्यता देण्यात आली आहे.

गृहमंत्री अमित शाहा यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या मंत्र्यांच्या समितीच्या बैठकीत कांदा निर्यातबंदी हटवण्याच्या निर्णयाला मंजुरी देण्यात आली आहे. गुजरात आणि महाराष्ट्रातील कांद्याचा साठा पाहता सरकारने ही कांद्यावरील बंदी उठवण्याचा निर्णय घेतला आहे. केंद्रीय मंत्री मनसुख मांडविया यांनी केंद्रीय गृहमंत्र्यांना कांदा शेतकऱ्यांच्या परिस्थितीबाबत माहिती दिली होती, त्यानंतर झालेल्या कांद्यावरील निर्यातबंदी उठवण्याचा निर्णय सरकारनं घेतला आहे.केंद्र सरकारनं कांदा उत्पादक शेतकऱ्यांना निराश करणारा निर्णय ८ डिसेंबरला घेतला होता. सरकारनं कांद्याच्या निर्यातीवर बंदी घातली होती. स्थानिक बाजारपेठांतील कांद्याचे दर नियंत्रणात आणण्यासाठी सरकारनं निर्यात बंदी करण्याचा निर्णय घेतला होता. ३१ मार्च २०२४ पर्यंत कांदा निर्यातबंदी राहणार असल्याचे परिपत्रक सरकारकडून काढण्यात आलं होतं. याचा मोठा फटका कांदा उत्पादक शेतकऱ्यांना बसला आहे. दरम्यान, सरकारच्या या निर्णयानंतर शेतकऱ्यांनी आक्रमक पवित्रा घेतला असून ठिकठिकाणा आंदोलन सुरु केली होती.

# छत्रपती शिवरायांचा पाळणा सोहळा उत्साहात





सोलापूर/प्रतिनिधीः छत्रपती शिवाजी महाराजांच्या जयंतीनिमित्त शहरातील मुख्य चौकामध्ये असलेल्या छत्रपती शिवाजी महाराजांच्या अश्वारूढ पुतळ्यासमोर रविवारी मध्यरात्री बारा वाजता श्री शिवजन्मोत्सव मध्यवर्ती महामंडळाच्यावतीने हजारो माता-भगिनींच्या उपस्थितीत पाळण्याचा अभूतपूर्व सोहळा मोठ्या उत्साहात पार पडला. चंद्र जसा हा इंद्र शोभतो, पुत्र जिजाऊंचा, झुलवा पाळणा, पाळणा, बाळ शिवाजीचा या पाळणा गीतावर हजारो महिलांनी ठेका धरला. या भव्य पाळणा सोहळ्यासाठी महिला नऊवारी साडी आणि पारंपरिक वेशभूषा परिधान करून शिवाजी चौकात मोठ्या प्रमाणात जमल्या होत्या. रात्री दहा ते बारा वाजेपर्यंत या सोहळ्याचे आयोजन करण्यात आले होते. हजारोंच्या संख्येने शिवप्रेमींनी या कार्यक्रमास हजेरी लावली होती.

# आता माघार नाहीच, सरकारला २० फेब्रुवारीचा अल्टिमेट; मनोज जरांगेंच्या उपोषणाचा दहावा दिवस



जालना (आंतरवाली सराटी) : मराठा आरक्षणाबाबत सरकराने काढलेल्या अध्यादेशाचे कायद्यात रुपांतर करण्याच्या मागणीसाठी मनोज जरांगे यांनी पुन्हा एकदा आंतरवाली सराटीमध्ये उपोषण सुरु केले आहेत. जरांगे यांच्या उपोषणाचा आजचा १० वा दिवस आहे. न्यायालयाच्या आदेशाने त्यांच्यावर उपचार करण्यात येत आहेत. शासकीय वैद्यकीय अधिकाऱ्यांच्या निगराणीखाली त्यांच्यावर उपचार करण्यात येत आहेत. सरकराने २० फेब्रुवारीला विशेष अधिवेशन बोलावून मराठा आरक्षणाबाबत निर्णय घेण्याची घोषणा केल्याने, जरांगे यांनी देखील सरकारला २० तारखेपर्यंत वेळ दिली आहे. तोपर्यंत मराठा समाजाने आंदोलन करू नयेत असे अवाहन जरांगे यांनी केले आहे. तर, आज सकाळी १०.३० वाजता पत्रकार परिषद घेऊन जरांगे आपली भूमिका आणखी स्पष्ट करण्याची शक्यता आहे.

मनोज जरांगे यांनी १० फेब्रुवारीपासून अप्ळूं उपोषणाला सुरवात केली असून, आज त्यांच्या उपोषणाचा आजचा १० वा दिवस आहे. मनोज जरांगे यानी १० फेब्रुवारीपासून अन्नाचा कण देखील घेतला नाही. सुरवातील त्यांनी पाणी आणि उपचार घेण्यास देखील नकार दिला होता. त्यामुळे त्यांची प्रकृती खालावली असल्याचे पाहायला मिळाले. शेवटी समाजबांधव आणि काही पत्रकारांनी आग्रह केल्यानंतर जरांगे यांनी पणी घेतले होते. मात्र, तरीही प्रकृती खालावत चालल्याने चिंता वाढली होती. दरम्यान, न्यायालयाने उपचार घेण्याचे आदेश दिल्यावर जरांगे यांनी उपचार घेण्यास सुरवात केली आहे. मात्र, मागील १० दिवसांत त्यांनी अन्नाचा कण देखील घेतला नाही. । पान २ वर

## शरद पवार यांच्या याचिकेवर आज सर्वोच्च सुनावणी



नवी दिल्ली : उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या नेतृत्वाखालील गटाला खरा राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष म्हणून मान्यता देण्याच्या निवडणूक आयोगाच्या आदेशाला आव्हान देणाऱ्या शरद पवार यांच्या याचिकेवर सर्वोच्च न्यायालयात उद्या (सोमवारी) सुनावणी होणार आहे. ही सुनावणी न्या. सूर्यकांत, न्या. दीपंकर दत्ता आणि न्या. के.व्ही. विश्वनाथन यांच्या खंडपीठासमोर होण्याची शक्यता आहे. शरद पवार यांनी १६ फेब्रुवारी रोजी महाराष्ट्राचे उपमुख्यमंत्री पवार यांच्या नेतृत्वाखालील गटाकडून व्हीप जारी केला जाऊ शकतो, असे सांगितल्यानंतर सर्वोच्च न्यायालयाने या याचिकेची तातडीने यादी करण्याचे मान्य केले होते. सिंघवी म्हणाले होते की, महाराष्ट्र विधानसभेचे अध्यक्ष राहुल नार्वेकर यांच्या १५ फेब्रुवारीच्या आदेशाच्या पार्श्वभूमीवर या याचिकेची तातडीने यादी करणे आवश्यक आहे. अजित पवार यांच्या नेतृत्वाखालील राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष हाच खरा राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष आहे आणि राज्यघटनेतील पक्षांतरविरोधी तरतुदींचा वापर अंतर्गत असंतोष दडपण्यासाठी करता येणार नाही, असे नार्वेकर म्हणाले. तत्पूर्वी, निवडणूक आयोगाने ६ फेब्रुवारी रोजी अजित पवार गट हाच खरा राष्ट्रवादी पक्ष असल्याचे जाहीर केले आणि गटाला पक्षाचे 'घड्याळ' चिन्हही दिले. आता विधानसभेचे कामकाज सुरू झाल्यावर शरद पवार गट पक्षाच्या व्हिपखाली असेल. दुसरीकडे अजित पवार गटाने अधिवक्ता अभिकल्प प्रताप सिंग यांच्यामार्फत सर्वोच्च न्यायालयात कॅव्हेट दाखल केले आहे

## स्ट्रॉबेरी पिकासाठी अनुदान देण्यासाठी शासन प्रयत्नशील : मुख्यमंत्री एकनाथ शिंदे

सातारा : महाबळेश्र्वर तालुक्यात मोठ्या प्रमाणात स्ट्रॉबेरी उत्पन्न घेतले जाते. यावरच येथील शेतकऱ्यांचे अर्थकारण अवलंबून आहे. शेतकऱ्यांच्या हितासाठी स्ट्रॉबेरी पिकाला शासन अनुदान देण्यासाठी प्रयत्नशील असून याबाबत जिल्ह्याचे पालकमंत्री शंभूराज देसाई, आमदार मकरंद पाटील यांच्याशी चर्चा केली जाईल, अशी ग्वाही मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी दिली.




पाचगणी येथील बिलीमोरिया शाळेच्या सभागृहात स्ट्रॉबेरी विथ सीएम या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. याप्रसंगी मुख्यमंत्री श्री. शिंदे बोलत होते. पालकमंत्री शंभूराज देसाई, आमदार मकरंद पाटील, मुख्य कार्यकारी अधिकारी याशनी नागराजन, अपर जिल्हाधिकारी जीवन गलांडे, टाईम महाराष्ट्रचे मुख्य संपादक राजेश कोचेकर, जिल्हा अधीक्षक कृषी अधिकारी भाग्यश्री फरांदे आदी उपस्थित होते.

मुख्यमंत्री श्री. शिंदे म्हणाले, शेतकऱ्यांनी आता पारंपरिक शेतीला आधुनिकतेची जोड दिली पाहिजे. शेत पिकावर प्रक्रिया उद्योग उभारल्यास शेतकऱ्यांना त्याचा अधिक फायदा होईल. यादृष्टीने शेतीमध्ये गुंतवणूक वाढविण्यासाठी प्रयत्न केले जात आहेत. शेतीमधून आर्थिक उत्पन्न वाढावे म्हणून मागेल त्याला शेततळे, ठिबक सिंचन, एक रुपयात पीक विमा अशा अनेक योजना राज्य शासन राबवीत आहेत. त्याचबरोबर अतिवृष्टीत बाधित शेतकऱ्यांना एनडीआरएफच्या निकषापेक्षा दुपटीने आर्थिक मदत करण्याचा निर्णयही शासनाने घेतला.

शेती करीत असताना शेतकऱ्यांना अनेक अडचणींना सामोरे जावे लागते, असे सांगून मुख्यमंत्री श्री. शिंदे म्हणाले, हे शासन सर्वसामान्यांचे, शेतकऱ्यांचे असल्याने या घटकांच्या विकासासाठी आवश्यक सर्व बाबी केल्या जातील. पर्यावरणाचा ऱ्हास रोखण्यासाठी सर्वांनी झाडे लावली पाहिजेत व त्याचे संवर्धनही केले पाहिजे. । पान २ वर

## मातंग समाजाच्या समस्यांबाबत सामाजिक न्याय विभाग सकारात्मक : सचिव सुमंत भांगे

मुंबई, दि.१८ : राज्यातील मातंग समाजाच्या समस्यांबाबत सामाजिक न्याय विभाग सकारात्मक असून या समाजाचे प्रश्न सोडवण्यासाठी आवश्यक कार्यवाही केली जाईल, अशी ग्वाही सामाजिक न्याय विभागाचे सचिव सुमंत भांगे यांनी मातंग समाजाच्या




शिष्टमंडळाला दिली.मातंग क्रांती महामोर्चा शिष्टमंडळाने श्री. भांगे यांची नुकतीच भेट घेऊन विविध मागण्यांचे निवेदन दिले. त्यावेळी आयोजित बैठकीत श्री. भांगे यांनी शिष्टमंडळास आश्र्वासित केले.मातंग क्रांती महामोर्चा शिष्टमंडळाने दिलेल्या निवेदनात अण्णाभाऊ साठे संशोधन व प्रशिक्षण संस्थेची निर्मिती करणे, जातीनिहाय जनगणना करणे, मातंग समाजाला वेगळे आठ टक्के आरक्षण देणे, अण्णाभाऊ साठे स्मारक (चिराग नगर) याची लवकर निर्मिती करणे, अण्णाभाऊ साठे विकास महामंडळातील कर्जासाठीच्या जाचक अटी कमी करणे, क्रांतिवीर लहुजी साळवे मातंग समाज अभ्यास आयोगाच्या शिफारशींची अंमलबजावणी करणे, क्रांतीसम्राट डॉ. बाबासाहेब गोपले यांचे फोटो अण्णाभाऊ साठे विकास महामंडळाच्या सर्व कार्यालयात लावणे या मागण्याचा समावेश आहे.

यावेळी बार्टीचे महासंचालक सुनील वारे , हिंदुस्थान ॲग्रो चे अध्यक्ष डॉ.ढोकणे पाटील, शिष्टमंडळातील सदस्य अशोक ससाणे, मोहनराव तुपसुंदर, सुदाम आवाडे, राजेंद्र साठे, देवेंद्र खलसे, सुनिता तुपसुंदर, श्रावण नाटकर, शामराव सकट, दिलीप कसबे, राजेश पवार, नानाभाऊ पाटोळे, अनिल साठे, श्रीमती छबुबाई सूर्यवंशी आदी उपस्थित होते.मातंग समाजाच्या संघटनेच्या वतीने आझाद मैदान मुंबई येथे दि. १८ जानेवारी २०२४ रोजी समाजाच्या अनेक प्रलंबित मागण्यासाठी मोहनराव कांबळे यांनी आमरण उपोषण केले होते. सामाजिक न्याय विभागाच्या विनंतीवरून त्यांनी उपोषण मागे घेतले होते. त्याअनुषंगाने शिष्टमंडळाची बैठक आयोजित करण्यात आली होती.

## माघी यात्रेनिमित्त पोलीस यंत्रणा सज्ज : उपविभागीय पोलीस अधिकारी डॉ.अर्जुन भोसले

पंढरपूर/प्रतिनिधीः माघी यात्रे निमित्त श्री विठ्ठल-रुक्मिणीमातेच्या दर्शनासाठी भाविक मोठ्या प्रमाणात येतात. दि.२० फेब्रुवारी २०२४ रोजी जया एकदशी असून, माघी यात्रा कालावधी २६ फेब्रुवारी २०२४ पर्यंत आहे. या कालावधीत पंढरपूरात येणाऱ्या भाविकांच्या तसेच नागरिकांच्या सुरक्षेसाठी तसेच वारी सुरक्षितपणे पार पडण्यासाठी पोलीस यंत्रणा सज्ज असल्याची माहिती उपविभागीय पोलीस अधिकारी डॉ.अर्जून भोसले यांनी दिली.

वारी कालावधीत पोलीस प्रशासनाने वारकरी तसेच स्थानिक नागरिकांच्या सुरक्षेला प्राधान्य दिले असून, सुरक्षेसाठी व वाहतुक नियत्रंणासाठी १ हजार ३९४ पोलीस अधिकारी व कर्मचारी यांची नेमणूक करण्यात आली आहे. यामध्ये ०१ उपविभागीय पोलीस अधिकारी, १० पोलीस निरिक्षिक, ५५ सहाय्यक पोलीस निरिक्षक व पोलीस उपनिरिक्षक, १० महिला सहाय्यक पोलीस निरिक्षक व पोलीस उपनिरिक्षक ६१८ पोलीस कर्मचारी व ७०० होमगार्ड तसेच एक जलद प्रतिसाद पथक, एक आरसीएफ तुकडी व दोन बीडीडीएस पथके नियुक्त करण्यात आले आहेत. वारी कालावधीत गर्दीवर नियंत्रण ठेवण्यासाठी तसेच कोणताही अनुचित



प्रकार घडू नये यासाठी नदीपात्र, ६५ एकर, महाव्दार चौक, महाव्दार घाट, पत्राशेड व नामदेव पायरी या सहा ठिकाणी वॉच टॉवर करण्यात आले आहेत. तसेच नदीपात्रासह, प्रदक्षिणा मार्ग, मंदीर परिसर, स्टेशन रोड आदी ठिकाणी १६२ सीसीटीव्ही कॅमेरे बसविण्यात आले असल्याचेही उपविभागीय पोलीस अधिकारी डॉ. भोसले यांनी सांगितले. वारी कालावधीत वाहतुकीची कोंडी होऊ नये भाविकांना वाहुकीचा कोणताही अडथळा येऊ नये यासाठी जिल्हा पोलीस अधिक्षक शिरीष सरदेशापांडे यांच्या आदेशान्वये जड वाहतुक शहराबाहेरुन वळविण्यात आली आहे . तसेच वाहतुक नियमनासाठी डायव्हरशन पॉईट व नाकाबंदी पॉईंट सुरु करण्यात आले आहे. त्याचबरोबर खाजगी वाहनधारकांच्या वाहनांना थांबण्यासाठी शहरात तसेच शहराबाहेर वाहनतळ व्यवस्था करण्यात आली आहे.भाविकांनी व नागरिकांनी सुरक्षेसाठी तसेच वारी सुरक्षित पार पाडण्यासाठी पोलीस प्रशासनास सहाकार्य करावे असे, आवाहनही उपविभागीय पोलीस अधिकारी डॉ.भोसले यांनी केले आहे.

दैनिक
# यश सिद्धि न्यूज



## संपादकीय

### हा प्रश्न उपस्थित होतो...

स्टेट बँक ऑफ इंडियाला ही योजना तातडीने बंद करण्याचे तसेच मागील पंधरा दिवसांत न वटवलेले निवडणूक रोखे परत करण्याचे आदेशही सर्वोच्च न्यायालयाने सर्व राजकीय पक्षांना दिले आहेत. सर्वोच्च न्यायालयाच्या आदेशातील आणखी एक महत्त्वाची बाब म्हणजे १२ एप्रिल २०१९ पासून आतापर्यंत निवडणूक रोख्यांच्या माध्यमातून कुठल्या राजकीय पक्षांना किती देणगी मिळाली याचा संपूर्ण तपशील सादर करून तो ३१ मार्चपर्यंत संकेतस्थळावर सार्वजनिक करण्यास सर्वोच्च न्यायालयाने स्टेट बँकेला सांगितले आहे. यामुळे कुणी कुठल्या पक्षाला किती देणगी दिली हे जनतेपुढे उघड होणार आहे. ऐन लोकसभा निवडणुकीच्या तोंडावर सर्वोच्च न्यायालयाने दिलेला हा निकाल भारतीय निवडणूक प्रक्रियेवर दूरगामी परिणाम करणारा आहे. याची सुनावणी सहा-सात वर्षे धूळ खात पडून होती. 'इंडिया इज अ मदर ऑफ डेमॉक्रसी' असल्याचे गौरवोद्‌गार पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी गेल्या वर्षी अमेरिकेतील संसदेत काढले होते. कुठल्याही देशातील पारदर्शक निवडणुका लोकशाहीच्या बळकटीची साक्ष देत असतात. गेल्याच वर्षी मोदी सरकारने प्रत्येक लोकसभा उमेदवाराला खर्चाची मर्यादा ७० लाखांवरून वाढवून ९५ लाख, तर विधानसभेसाठी मर्यादा २८ लाखांवरून ४० लाख रुपये केली होती. मात्र, हे केवळ दाखवायचे आकडे आहेत. आपल्याकडे साधी नगरसेवकपदाची निवडणूक लढवायची झाल्यास कोट्यवधी रुपये खर्चाची तयारी ठेवावी लागते. निवडणूक खर्चाच्या मर्यादेत प्रचार आणि कार्यकर्त्यांना खूश करणे शक्य नसते. अशा वेळी व्यापारी-उद्योजक उमेदवारांच्या मदतीला धावून येतात. अर्थात निवडणुकीतील विजयानंतर भ्रष्ट मार्गांचा अवलंब करून मदतीची परतफेड केली जाते. मोदी सरकारने देशात निवडणूक लढवणाऱ्या राजकीय पक्षांना मिळणाऱ्या निधीच्या स्रोतात पारदर्शकता आणण्याच्या नावाखाली निवडणूक रोखे योजना आणली. मात्र, या योजनेची चौकट आपल्या सोयीने आखल्याने त्यातील फोलपणा उघड झाला. काँग्रेस आघाडीच्या राजवटीतील भ्रष्टाचार खोदून काढण्याची भाषा करीत सत्तेवर आलेल्या मोदी सरकारने भ्रष्टाचार संपवण्यासाठी कधी नोटाबंदी केली, तर कधी ईडीचा बेमालूमपणे वापर केला. परंतु, आजवर त्यात यश आलेले नाही. त्यातच निनावी निवडणूक रोखे पध्दत आणून काळ्या पैशांमध्ये भर घातली की काय, असा प्रश्न यानिमित्ताने उपस्थित होतो.

पान १ वरुन

### आता माघार नाहीच, सरकारला ..

मनोज जरांगे यांच्या उपोषणाची सरकार दखल घेत नसल्याने राज्यभरात मराठा समाज आक्रमक होतांना पाहायला मिळत आहे. हिंगोली जिल्ह्यांमध्ये मराठा आरक्षणाच्या मागणीसाठी तिसऱ्या दिवशी सुद्धा आंदोलनाची धग पाहायला मिळाली. हिंगोली जिल्ह्यातील हयातनगर फाटा येथे सकल मराठा समाजाच्या वतीने नांदेड-परभणी महामार्ग रोखण्यात आला होता. यामुळे वाहनांच्या लांबच लांब रांगा लागल्या होत्या. तब्बल तीन तास सुरू असलेल्या रास्ता रोकोमुळे वाहतुकीचा मोठा खोळंबा झाल्याचे पाहायला मिळाले. मराठा आरक्षणाची अंमलबजावणी करा आणि मनोज जरांगे यांच्या उपोषणाला पाठिंबा यासाठी हे रास्तारोको आंदोलन करण्यात आले.

मराठा समाजाला तात्काळ आरक्षण जाहीर करून सगेसोयरे कायदा लागू करण्यात यावा या मागणीसाठी बीड जिल्ह्यातील लिंबागणेश येथे रास्ता रोको आंदोलन करण्यात आले. आरक्षणाच्या प्रश्नावरून संतप्त झालेल्या मराठा बांधवांनी अहमदनगर ते अहमदपूर रस्ता एक तास आडून धरला होता. त्यामुळे रस्त्याच्या दोन्ही बाजूने वाहनाच्या रांगा लागल्या होत्या. तर, दुसरीकडे मनोज जरांगे पाटील यांच्याबद्दल नारायण राणे यांनी जे वक्तव्य केले आहे, त्याचा देखील निषेध मराठा समाजाच्या वतीने करण्यात आला.

### स्ट्रॉबेरी पिकासाठी अनुदान

महाबळेश्र्वर व जावळी हे डोंगरी तालुके आहेत. येथील नागरिक कामासाठी मुंबई येथे जातात . ते पुन्हा गावात यावेत, नोकरीच्या शोधार्थ शहरात जाणाऱ्यांना स्थानिक पातळीवरच रोजगार उपलब्ध व्हावेत यासाठी पर्यटन वाढी बरोबर रोजगार निर्मितीवर भर देत आहोत. येथील शेतकऱ्यांनी बांबू लागवडीकडे वळावे. बांबू नगदी पीक असून बांबूपासून फर्निचर,इथेनॉल निर्मिती करता येते. बांबू लागवडीसाठी शासन अनुदान देत असून याचा लाभ घ्यावा, असे आवाहनही त्यांनी केले. स्ट्रॉबेरीपासून वाईन निर्मितीचा प्रकल्पही महाबळेश्र्वर येथे उभारण्यात येईल, असेही मुख्यमंत्री श्री शिंदे यांनी यावेळी सांगितले.या कार्यक्रमास महाबळेश्र्वर तालुक्यातील स्ट्रॉबेरी उत्पादक शेतकरी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## रयतेचे राजे छत्रपती माझे..

लोकशाहीमध्येही ज्या राजाचा गौरव होतो त्यापैकी एक महत्वपुर्ण नाव म्हणजे छत्रपती शिवाजी महाराज होय. चारशे वर्षा नंतरही छत्रपती शिवाजी महाराज यांचा आदर जनतेच्या मनात आहेत. याचे एकमेव कारण म्हणजे त्यांचे कार्य. ते राजे असले तरीही त्यांनी राजेशाही राबवली नाही. स्वतः राजा असुन जनतेची काळजी घेऊन जनकल्याण करणारा राजा म्हणजे छत्रपती शिवाजी महाराज होत. देशात अनेक राज घराणे छत्रपती शिवाजी महाराज यांच्या अगोदर होते. परंतू राजेशाही मध्ये वेगवेगळ्या माध्यमातून जनतेची लुट होऊन जनतेवर वेगवेगळ्या प्रकारचे अत्याचार होत होते. जनतेचा आणि राजाचा कधीच संबंध नसलेले आणि राजाच्या जवळचेच लोक अन्याय अत्याचार करून जनतेची लुट करत असत अशा वेळी न्याय कोणाकडे मागायचा हा मोठा प्रश्र्न जनतेसमोर उभा होता. म्हणून राजेशाही मध्ये जनता गुलामा सारखे जिवन जगत होती. राजाचा आदेश म्हणून कोणत्याही प्रकारच्या बंधनात



अडकून राहण्याची सवय जनतेला झाली होती. राजेशाही चे बंधने वेगळे होती आणि भारतातील सामाजिक व्यवस्थेचे बंधने वेगळे होती. म्हणजे जनता दुहेरी गुलाम होती. राजाकडे शारिरीक गुलामी तर येथील विषमतावादी व्यवस्थेकडे मानसिक गुलामी. देशात अनेक राजे आले गेले त्यांनी वेगवेगळ्या भागात वेगवेगळे राज्य जरी केले, प्रत्येकांचे राज्य करण्याचे नियम जरी वेगळे असले तरीही भारतीयांना मानसिक गुलामी चे बंधने भारत भर सारखेच होते. माणसिक गुलामी लादणारे एकाच विचार सरणीचे होते. म्हणून राजाकडून जनतेचे शोषण व्हायचे ते वेगळे आणि माणसिक गुलामीच्या माध्यमातून जनतेचे शोषण व्हायचे ते वेगळे. परंतु छत्रपती शिवाजी महाराज यांच्या रुपाने एक राजा राजेशाही चे बंधने आणि सामाजिक विषमतेची बंधने तोडून टाकून खऱ्या अर्थाने आदर्श लोक कल्याणकारी राज्यांची संकल्पना तयार करून त्या विचाराची पेरणी करतात. राजा हा जनतेचा शोषण करणारा नसुन रयतेचा पालण पोषण करणारा आहे ही भावना जनमानसात छत्रपती शिवाजी महाराज यांनी रुजवली. सामाजिक व्यवस्था ही विषमतेवर आधारित होती. जातीची उतरंड तयारी करून विकृत मानसिकतेचे लोक स्वतः ला श्रेष्ठ समजत होते. स्वतः च स्वतःला श्रेष्ठ समजणारे किती भ्रष्ट असतात हे नव्याने सांगण्याची गरज नाही. छत्रपती शिवाजी महाराज यांच्या रुपाने राजेशाही गुलामी व मानसिक गुलामी दुरू होऊन माणसाला सुखाचे दिवस यायला सुरवात झाला. एक गोष्ट लक्षात घेणे आवश्यक आहे ती म्हणजे राजा ज्या प्रांताचा असतो त्या प्रांतातील सर्व जनता हि त्याच राजाचा असते. म्हणजे राजा हा आपल्या प्रांतातील जनतेच्या विरोधात नसतो. राजाचा संघर्ष हा जनतेशी नसुन विरोधी राजांशी असतो मग तो जातीने धर्माने कोणीही असो. हीच गोष्ट समजने खुप महत्त्वाचे असते. कोणताही राजा जाती धर्माच्या विरोधात कधीच नसतो हे समजून घेणे आवश्यक आहे. राजा विचाराचा विरोधात असु शकतो. जर राजाला धर्माच्या विरोधात असते तर कृष्णा कुलकर्णी अफजल खानाचा वकील कसा झाला असता यावर प्रामाणिक चिंतन होणे आवश्यक आहे. छत्रपती शिवाजी महाराज यांनी अठरा पगडजाती एकत्र करून मावळा ओळख दिली आणि जातीभेदाला मुठमाती दिली. सैन्यामध्ये सर्व जातीधर्माच्या लोकांना समान वागणूक दिली. शेतकऱ्यांच्या समस्या जाणून घेऊन त्या सोडवण्यासाठी राजे असूनही प्रयत्न केले. शेतसारा गोळा करण्याच्या नावाखाली जी लुट होत होती ती लुट थांबवली. दुष्काळ सारख्या परिस्थिती मध्ये शेतकऱ्यांना कृषी उपयोगी साहित्य देऊन कृषीउत्पन्नासाठी सहकार्य करून कृषीमाल आल्या नंतर त्याची योग्य ती वसुली करून शेतकऱ्यांना मोठा आधार देण्याचे काम केले. युद्धासाठी किंवा इतर कोणत्याही कारणाने सैन्याला एका ठिकाणाहून दुसऱ्या ठिकाणी जायचे असेल तर हत्ती घोडे किंवा इतर काही प्राण्यांसाठी रस्त्याने चारा वैरण लागत असताना कोणत्याही शेतकऱ्यांना त्रास न देता चारा वैरण शेतकऱ्यांकडून विकत घेण्याची व्यवस्था निर्माण करून शेतकऱ्यांना आर्थिक सक्षम करण्याचे काम केले. सैन्यासह इतर कोणीही रस्त्याने ये जा करत असेल तर कोणत्याही शेतकऱ्यांला त्रास न होता त्यांच्या कोणत्याही पिकाला धक्काही न लागता येजा व्हावी असे फर्मान सोडून जनतेला ही जागृत करणारे छत्रपती शिवाजी महाराज होते. राजेशाही अजूनही जनतेला बोलता येत होते, राजाकडून अडीअडचणीला मदत होत होती. महिलांना मान सन्मान सोबत संरक्षण मिळत होते. रयतेला न्याय हा जात धर्म बघून नाही तर गुन्हा बघुन मिळत होता. छत्रपती शिवरायांनी स्वतः च्या जातीच्या धर्माच्या लोकांना कठोर शिक्षा केली. महिलांवर वाकड्या नजरेने बघणाऱ्यांचे डोळे काढणारे छत्रपती शिवाजी महाराज यांनी जाती धर्माला नाही तर माणसाला प्राधान्य दिले. मानवतेसाठी, मानवकल्याणासाठी छत्रपती शिवाजी महाराज यांनी आपले स्वराज्य उभे केले सर्वांना सुख समाधान दिले. हा मानवतावादी इतिहास असुनही काही विकृत राजकीय लोक छत्रपती शिवाजी महाराज यांना जाती धर्मात बंद करून त्यांचे कार्य मर्यादित करण्याचा बदमाशपणा करण्याचा प्रयत्न करत आहेत. राजकीय नेत्यांची व स्वतः लाच श्रेष्ठ समजणाऱ्या विकृत लोकांचे अस्तित्वच विषमतेवर आधारित आहे. आणि हेच विकृत लोक छत्रपती शिवाजी महाराज यांचे नाव घेऊन, चुकिचा इतिहास व दाखले देऊन छत्रपती शिवाजी महाराज यांच्या नावाचा वापर धर्मविरोधी करून स्वतः ची झोळी भरून घेतात. छत्रपती शिवाजी महाराज यांचे कार्य हे स्वराज्यातील प्रत्येक माणसासाठी सारखेच होते. मग तो कोणत्याही जाती धर्माचा असो. जर छत्रपती शिवाजी महाराज हे एकाच जातीचे राजे असते तर छत्रपती शिवाजी महाराजांचा जनमाणसात आदर सन्मान कसा वाढला असता? विकृत लोकांकडून चुकिचा इतिहास ऐकल्यापेक्षा स्वतः इतिहास वाचला तरच छत्रपती रयतेचे कल्याणकारी राजे होते हे सिद्ध होते. छत्रपती शिवाजी महाराज यांचे नाव घेऊन राजकारण करून स्वतः ची झोळी भरणारे लोक छत्रपतींच्या विचाराने चालतात का हे डोळसपणे बघून समिक्षा करणे गरजेचे आहे. छत्रपती शिवाजी महाराज राजा असूनही प्रजेच्या हिताचे काम करत होते. आज लोकप्रतिनिधी जनतेचे सेवक असुनही जनतेला लुटत आहेत. जनतेला लुटणारा खऱ्या अर्थाने छत्रपती शिवाजी महाराज व स्वराज्याचा शत्रु आहे. आज माणूस धोक्यात आहे. शेतकरी, स्त्रिया धोक्यात आहेत, शेतकरी रस्त्यावर उतरून न्याय माघत आहे परंतु जनतेचे सेवक असलेले नेते जनतेवरच वार करत आहेत. सत्ताधारी बलात्कारी, व्यभिचारी लोकांना शिक्षेपासून सुट तर सर्व सामान्य जनतेची लुट आहे. छत्रपती शिवाजी महाराज हे राजे असुनही जनतेचा एकही पैसा वैयक्तिक फायद्यासाठी वापरला नाही. आजचे जनतेचे सेवक स्वतः चा लिलाव करून जनतेच्या मताना आदर व समस्यांचे गांभीर्य लक्षात घेत नाहीत. छत्रपती शिवाजी महाराज यांच्या राज्यात जनता, महिला व शेतकरी सुखी होते. परंतु त्याच देशात छत्रपतींचे नाव घेऊन राजकारण करणारे लोक सत्तेत असतानाही जनता, शेतकरी किंवा महिला सुरक्षित व समाधानी आहेत का? आपण छत्रपती शिवाजी महाराज यांची जयंती साजरी करताना फक्त फोटो ला हार घालून वंदन करून चालणार नाही तर देशातील जनतेचे सेवक हे छत्रपती शिवाजी महाराज यांच्या विचाराने , संविधानाला अनुसरून, लोककल्याणकारी कामे करतात का? याचे उत्तर मिळवून व्यवस्थेला प्रश्र्न विचारून जनतेचे प्रश्र्न सोडवले तरच छत्रपतींच्या विचारातील कार्य पुर्ण होत आहे याचे समाधान व जयंती साजरी करण्याचे सार्थक होईल. जाती धर्मात छत्रपतींना बंध करून छपतींचा वापर द्वेष पसरवण्यासाठी काही विकृत लोकांकडून हानुन पाडण्यासाठी आपल्याला जागृत व्हावे लागेल. कारण छत्रपती ही कोणत्याही जाती धर्माच्या विरोधात नव्हते तर अन्याय अत्याचार व सामाजिक विषमतेविरोधात होते. सामाजिक समता प्रस्थापित करून रयतेला खऱ्या अर्थाने छत्रपती शिवाजी महाराज यांनी सुखी समाधानी केले म्हणून स्वराज्यातील प्रत्येक रयतेला छत्रपती आजही स्वतः चे वाटतात. हेच छत्रपतींचे महान कार्य आजही समाजात पेरता यावे म्हणून जयंती साजरी करून जागृती करणे गरजेचे आहे. रयतेचे राजे छत्रपती शिवाजी महाराज यांच्या जयंतीनिमित्त समस्त मानवतावादी लोकांना मंगलमय सदिच्छा...

**विनोद पंजाबराव सदावर्ते**
**मोबा: ९१३०९७९३००**

## रिजवान शेख, छत्रपती शिवाजी मुस्लिम ब्रिगेड सोलापूरच्या जिल्हा उपाध्यक्षपदी बिनविरोध निवड.

दर्शनाळ/प्रतिनिधीः छत्रपती शिवाजी मुस्लिम ब्रिगेडचे जिल्हा उपाध्यक्षपदी शेख रिजवान सर यांची एकमताने निवड झाल्याचे नियुक्तीपत्र मराठा सेवा संघ जिल्हाध्यक्ष डॉ. जी के देशमुख साहेब , मराठा सेवा संघ शहराध्यक्ष सूर्यकांत पाटील साहेब यांच्या शुभहस्ते व , संघटनेच्या मार्गदर्शक राम गायकवाड सर , शहराध्यक्ष हाजी मतीन बागवान ,जिल्हाध्यक्ष शफीक रचभरे यांच्या प्रमुख उपस्थितीत


नियुक्त पत्र देऊन सन्मानित करण्यात आला.रिजवान शेख सामाजिक व शैक्षणिक क्षेत्रात कामाचा चांगला ठसा उमटला आहे. त्यांनी आपल्या मनोगतात संघटनेचा एकच हेतू सोलापूर शहरात शांतता, एकात्मत व बंधुभाव कायम राहावे या करिता



महापुरुषांची जयंती, पुण्यतिथी, गणेश उत्सव, मकरसंक्रांत दिवशी नंदीध्वजावर फुलांची उधळण असे विविध कार्यक्रम संघटनेच्या वतीने मोठ्या उत्साहाने साजरा करतो असे माहिती दिली.या कार्यक्रमात छत्रपती शिवाजी मुस्लिम ब्रिगेड शहर व जिल्ह्याची नवीन कार्यकारिणी जाहीर करण्यात आली. यावेळी बहुसंख्याने हिंदू मुस्लिम बांधव उपस्थित होते.

## आई भवानीला करूनी नमन, शिवरायांना करते वंदन

बाजी, गोमाजी, तानाजी, येसाजी या वीरांची होती राजांकडे खाणं,म्हणून कधीही बसली नाही राजांना शूरांची वाणं.राजांनी रयतेसाठी शत्रू नावाच्या बाजूंस सारली घाणं, म्हणून जनता गात होती आणि गात राहिल माझ्या राजाचे गुणगानं.छत्रपती हा त्यांचा सन्मान आहे, म्हणून आमच्या राजांमुळेच स्त्रीला मान आहे.मराठी मातीला त्यांचा अभिमान आहे, जिजाऊंचे आपल्यावर खूप ऋण आहेत.अहो आमचे राजे महाराष्ट्राची शान आहे, गडकिल्ले सुद्धा महाराष्ट्रासारखे महान आहेत,त्यात रायगड जिल्हा महाराष्ट्राची शान आहे.अहो शिवरायांचे आशीर्वाद आमच्यासाठी धन आहे,शिवरायांमुळेच मराठी माती संपन्न आहे.जिजाऊ तूं आणि तुझे उपकार धन्य आहेत, राजांनी प्रत्येक स्त्रीला जपायला शिकवलं हा आमचा स्वाभिमान आहे.हो आमचे राजे महाराष्ट्राची शान आहे.... महाराष्ट्राची शान आहे....स्वच्छ निर्मळ पाण्यासारखं माझ्या बापाच मन आहे, इतिहासात त्यांच्या मनाच्या पराक्रमाने कोरलेलं पानं आहे.... शत्रूंपुढे होते शक्तीने ते लहान, पण युक्ती आणि किर्ती त्यांची होती खूप महान.राजांची जयंती हा मराठी माणसाचा आहे सणं, राजासारखा पुत्र देऊन विश्र्वाला, जिजाऊंनी लावलें स्वराज्याच्या दारी तोरणं.आपल्या राजांच नावं नाही असां मराठी मातीत इकही नाही, पण इतिहासात सुवर्ण अक्षरांनी लाहिला गेला आहे, राजांनी लढलेला नाही प्रत्येक दिन .....



शिवजयंतीच्या हार्दिक शुभेच्छा

**सौ. प्रियांका देविदास माने दर्शनाळ ग्रामपंचायत सदस्य ९८३४२९७९९५**

## थकलेला पिकविमा रक्कम व दुष्काळ मदत निधी तात्काळ द्यावे : शिवसेना ठाकरे गटाची मागणी

अक्कलकोट/महेश गायकवाड : थकलेला पिकविमा रक्कम, दुष्काळ मदत निधी त्वरित दया व भिमा नदीत पाणी लवकरात लवकर सोडा तसेच अक्कलकोट तालुक्यातील सर्व सोलर कंपनी शेतकऱ्यांची फसवणुक करुन अल्प मोबदला दिला आहे त्याची योग्य मोबदला भाग पाडावे किंवा फसवणुकीच्या गुन्हा दाखल करावा अशी मागणी शिवसेना ठाकरे गटाकडून करण्यात आली आहे.

संपुर्ण अक्कलकोट तालुक्यात दुष्काळ पडलेला आहे.यासह अनेक विषयाच्या मागण्या सह प्रभारी तहसीलदार यांना शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाच्या वतीने. जिल्हा संपर्कप्रमुख अनिल कोकीळ जिल्हा प्रमुख अमर पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली तालुका प्रमुख आनंद बुक्कानुरे यांच्या नेतृत्वाखाली निवेदन देण्यात अक्कलकोट तालुक्यात चालुवर्षी तीव्र दुष्काळ पडलेला आहे व शासनाच्या वतीने जाहिर ही झालेला आहे. शेतकऱ्याकडे जगण्यासाठी शेती शिवाय दुसरा कुठलेही उत्पादनचे साधन नाही. त्यामुळे यावर्षाच्या दुष्काळ मदत निधी प्रति हेक्टरी ५० हजार प्रमाणे व यावर्षीचे पीक विमा रक्कम फक्त सोयाबीन पिकाचे मिळाले आहे सोयाबीन पीक अक्कलकोट तालुक्यात खूप कमी प्रमाणात आहे .नाही म्हटले तरी कांही हरकत नाही. इतर सर्व पीकांची पीक विमा रक्कम शासनाकडे पेंडीग आहे. तसेच तालुक्यातील शेतकरी अंत्यत अडचणीत आहे.तरी विमा कंपनीला योग्य निर्देश देऊन पीक विमा रक्कम ताबडतोब मिळवून द्यावी तसेच तडवळ भागातील २८ गावांना भिमानदी द्वारे पाणी पुरवठा व तेथील शेतकऱ्यांच्या शेती भिमा नदीच्या पाण्यावर अवलंवबुन आहे.शेतकऱ्यांचे पीकासाठी व पिण्यासाठी पाण्याची तीव्र टंचाई भासत आहे.तरी भिमा नदी मध्ये उजनीतून किंवा कर्नाटक सरकार बरोबर बोलणी करुन आलमट्टी येथुन पाणी सोडण्याची व्यवस्था ताबडतोब करावी.तालुक्यातील बहुसंख्य शेतकऱ्यांना सोलर कंपनी शासनाचा प्रति एकरी ५० हजार रु देण्याचा आदेश व जीआर असतांना शेतकऱ्यांची फसवणुक करुन २० हजार ते ३० हजार रु शेतकऱ्यांना देत आहेत. तरी तालुक्यातील शेतकऱ्यांना प्रति एकरी शासन निर्णय प्रमाणे ५० हजार रु मिळावे व भुमीपुत्रांना नौकरीमध्ये सामावुन घ्यावे. प्रामुख्याने

ब्यागेहळ्ळी, कोन्हाळी, हसापूर, घोळसगांव, तडवळ, मंगरुळ, सह तालुक्यातील अन्य गावात शेतकऱ्यांची मोठी फसवणुक झाली आहे. तरी या शेतकऱ्यांना ताबडतोब न्याय मिळवून द्यावे.

वरिल दिलेल्या सर्व विषयानुसार ८ दिवसात कारवाई झाली नाही, तर शिवसेना उध्दव बाळासाहेब ठाकरे अन्यथा पक्षाच्या वतीने तीव्र




आंदोलन करण्यात येईल याची गंभीर दखल घ्यावी.असा इशारा शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाच्या वतीने तालुका प्रमुख आनंद बुक्कानुरे यांनी दिले. या वेळी विधानसभा संपर्क प्रमुख उमेश सांरग उपजिल्हाप्रमुख सुनील कटारे शहर प्रमुख सिद्धाराम गुबयाड श्रीकांत शेडम प्रदीप बनसोडे युवराज जोशी रोहित गवंडी मनोज शिंदे माणिक माशाळे सह शिवसैनिक उपस्थित होते.

हे वृत्तपत्र मालक, सिद्धार्थ सोशल फौंडेशन यांनी, मुद्रक, प्रकाशक, संपादक, कमलाकर ज्ञानदेव सोनकांबळे यांच्या सम्यक पब्लिकेशन्स अँड प्रिंटर्स २४७, बुद्ध विहार , रमाबाई आंबेडकर नगर, बुधवार पेठ सोलापूर ४१३००२ महाराष्ट्र येथे छापून मु.पो. गोगांव ता. अक्कलकोट जि सोलापूर ४१३२१८ महाराष्ट्र येथे प्रकाशित केले. संपादक : कमलाकर ज्ञानदेव सोनकांबळे email ; yashsiddhinews@gmail.com www.yashsiddhinews.com mo: 9921988358

This newspaper is printed by the Owner , Shidharth Social Foundation, Printer, Publisher, Editor, Kamalakar Dayndev Sonakamble at Samyak Publications and Printers 247, Budha Vihar, Ramabai Ambedkar Nagar, Budhwar Peth Solapur 413002 [Maharashtra], Published, at Gogaon Tal Akkalkot Dist Solapur 413218 [Maharashtra]. Editor : Kamalakar Dayndev Sonakamble

# गुंजेगाव येथील शेकडो ग्रामस्थांनी अभिजीत पाटलांच्या गटात केला प्रवेश

## ग्रामस्थांनी जेसीबीतून फुलांची उधळण करत अभिजीत पाटील यांचे जंगी स्वागत केले




पंढरपूर/प्रतिनिधीः काही दिवसांमध्येच राष्ट्रवादी काँग्रेस पक्षामध्ये फूट पडली असता देशाचे नेते माजी कृषीमंत्री खा.शरद पवार यांना सोडून भले भले मोठे नेते सोडून गेले असता गेली काही दिवसांपूर्वीच श्री विठ्ठल सहकारी साखर कारखान्यावर शरद पवार आले असता कारखान्याचे चेअरमन अभिजीत पाटील यांचा पक्षप्रवेश झाला होता परंतु अभिजीत पाटील यांनी शरद पवार गटाची साथ सोडली नाही. पक्षाची जबाबदारी घेऊन अभिजीत पाटीलांनी माळशिरस, टेंभुर्णी, सोलापूर, पंढरपूर, मंगळवेढा, सांगोला, माढा येथे शरद पवारांना घेऊन दौरे केले असल्याचे दिसून आले.अभिजीत पाटलांच्या मागे शक्ती उभी करा,असे मंगळवेढा येथे चक्क शरद पवारांनी सांगितले असलेला शब्द खरा ठरवत अभिजीत पाटील यांनी कामाचा झपाटा लावला दिसून आला आहे. पंढरपूर – मंगळवेढा ग्रामीण शहरी भागात विविध सांस्कृतिक, मैदानी कार्यक्रम घेऊन आपली लोकप्रियता वाढवून, घरोघरी पोहोचण्याचं अभिजीत पाटील जोर देत आहेत.

अभिजीत पाटील यांच्या मागे लाखो जणांची शक्ती उभा करून येत्या विधानसभेच्या निवडणुकीमध्ये अभिजीत पाटील यांना आमदार करून विधानसभे मध्ये पाठवू असा प्रवेश केलेल्या मंडळानी उद्गार काढले.पाटील कयांच्यामागे एक मोठी शक्ती मिळाली असून पंढरपूर मंगळवेढा मध्ये गावोगाव खेडोपाडी जाऊन प्रत्येकाच्या सुख, दुःखामध्ये, विविध कार्यक्रमांना भेटी देऊन अभिजीत पाटील यांनी दांडगा जनसंपर्क वाढवण्याचे दिसून येत आहे. गेल्या काही दिवसांमध्ये मंगळवेढा, पंढरपूर येथील राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार गटाच्या विविध सेलच्या पदाधिकाऱ्यांच्या निवडी करून कार्यकर्त्यांना बळ देण्याचे देखील अभिजीत पाटील यांनी काम केलेले आहे.गुंजेगाव तालुका मंगळवेढा येथील डॉ.प्रशांत कांबळे,बालाजी मेटकरी, दत्ता ढोणे, विष्णू नरळे, शंकर चौगुले, सिताराम सातपुते, भारत माने, परमेश्र्वर डुम, निलेश माने, सिद्धेश्र्वर डूम, मारुती चौगुले, अनिल चौगुले, रोहित लंगोटे, दादा लंगोटे, अंकुश जगदने, ज्ञानेश्र्वर कुदळे, नवनाथ बुडबुडे, राजू कांबळे, दिगंबर पवार, आत्मा कांबळे, दत्ता बालगिरे, सुरेश पाटील, पप्पू कांबळे, पप्पू पाटील, नागू चौगुले, नंदू चौगुले, तुकाराम चौगुले, सोमनाथ डुम, प्रकाश सुतार, सागर चौगुले, अमर सुतार, तुकाराम कांबळे, भारत ढोबळे, अनिल ननवरे, ज्ञानेश्र्वर मेटकरी, सचिन चौगुले, नंदू मिटकरी, राजू कोरे, किसन कांबळे, विलास ढोणे, सोमनाथ काळे, सौदागर कुदळे यासह आदी मान्यवरांनी प्रवेश करत अभिजीत पाटील यांच्या नेतृत्वावर विश्र्वास ठेवून पाटील यांच्यासोबत काम करण्याचे एक संघ एक दिलाने ग्रामस्थांनी सांगितले..

यावेळी मंगळवेढा राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार गटाचे तालुकाध्यक्ष प्रथमेश पाटील, अंधळगावचे सरपंच लहुजी लेंडवे, विठ्ठल कारखान्याचे संचालक सचिन वाघाटे, रमेश इंगोले, पांडुरंग कोष्टी, विठ्ठलचे संचालक दशरथ जाधव, लक्ष्मी दहीवडी हणमंत क्षीरसागर, डॉ. राजेंद्र यादव, युवा नेते काकासाहेब मोरे, अजिंक्य बेदरे, विठ्ठल ढगे, पप्पू भोसले, राहूल मेटकरी यासह आदी मान्यवर उपस्थित होते..

# गाव शहर में लगावो जोर ! चलो मेरे साथ सत्ता कि और !! : रामदास आठवले



पंढरपूर/प्रतिनिधीः रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडिया आठवले राष्ट्रीय अध्यक्ष, केंद्रीय मंत्री मा.ना.रामदासजी आठवले साहेब यांच्या आदेशानुसार महाराष्ट्र प्रदेशाध्यक्ष मा.राजाभाऊ सरवदे साहेब यांच्या मार्गदर्शनाखाली दि.१७–२–२४ शनिवार रोजी रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडिया (आठवले) पंढरपूर तालुक्याच्या वतीने २५ फेब्रुवारी संविधान सन्मान मेळावा,

गाव तिथे शाखा,मी रिपब्लिकन सदस्य जोडो अभियान ह्या विषयावर पुळज,चळे गटात व तुंगत गटात गाव भेट दौरा करून बैठका घेण्यात आल्या.हया बैठकीचे अध्यक्ष रिपाइं तालुकाध्यक्ष संतोष पवार हे होते. तसेच प्रमुख मार्गदर्शक म्हणून पश्र्चिम महाराष्ट्र सरचिटणीस जितेंद्र बनसोडे,प.महा.उपाध्यक्ष आप्पासाहेब जाधव,बाळासाहेब कसबे हे होते.या वेळी ता.कोशाध्यक्ष विजय वाघमारे ता.सरचिटणीस दयानंद बाबर,ता.उपाध्यक्ष भैय्या फडतरे,ता.उपाध्यक्ष समाधान आठवले,चळे माजी सरपंच सोनटक्के, तुंगत ग्राम पंचायत सदस्य बत्तासराव वनसाळे,चळे ग्राम पंचायत सदस्य सुशील वाघमारे, जिल्हा परिषद सदस्य उत्तम फडतरे,आंबे लक्ष्मण गायकवाड,पोहरगा बाळु वाघमारे,कोंडरकी विजय सरतापे,नेपतगाव क्षिरसागर,विटे माजी सरपंच आबा परकाळे, करकंब अध्यक्ष राजु शिंदे, तुंगतचे अमर फडतरे, निलेश वनसाळे,सचिन माने, सुस्तेचे संजय लोखंडे, चंद्रकांत माने, देविदास वाघमारे तसेच तालुका पदाधिकारी उपस्थित होते.तसेच जिल्हा परिषद व पंचायत समिती गणातील सर्व प्रमुख पदाधिकारी, कार्यकर्ते मोठ्या प्रमाणात उपस्थित होते.

# कुंभारी येथील गाजलेल्या खून प्रकरणातून रमेश सिद्रामप्पा पाटील यांची दहा वर्षानंतर निर्दोष मुक्तता



शिरवळ/हणमंत घोदेः कुंभारी (ता. दक्षिण सोलापूर) येथील उद्योगपती गुरुनाथ कटरे यांचा (२०१४) मध्ये कुंभारी घरकुल येथे खून झाला होता. याप्रकरणी तत्कालीन पोलीस उपआधीक्षक कृष्णकांत उपाध्याय यांनी तीन संशयित आरोपींना अटक केली होती.या तीनही आरोपींना उच्च न्यायालयाने(२०२३) मध्ये पुराव्या अभावी निर्दोष मुक्तता केली होती .मुख्य संशयित म्हणून माजी आमदार सिद्रामप्पा पाटील यांचे सुपुत्र रमेश पाटील यांचे नाव गोवले होते.त्यांनी (२०२३) मध्ये अक्कलकोट न्यायालयात स्वतः होऊन हजर झाले.त्यानंतर त्यांना सीआयडी कडे वर्ग करण्यात आले. सीआयडीने तपास पूर्ण करण्यास नऊ महिन्याचा काळ घालवल्याने त्यांचा सोलापूर येथील न्यायालयाने दि . १६ फेब्रुवारी रोजी सरकार पक्षातर्फे कुठलेही साक्षी,पुरावे उपलब्ध न झाल्याने त्यांची या खून खटल्यातून निर्दोष मुक्तता केली.याप्रकरणी उच्च न्यायालयात महेश जेठमलानी यांनी तर सोलापूर न्यायालयात पाटील यांच्याकडून मिलिंद थोबडे,राजकुमार म्हात्रे यांनी काम पाहिले.अखेर सत्याचा विजय झाल्याचे मत माजी आमदार सिद्रामअप्पा पाटील यांनी यावेळी व्यक्त केले.रमेश पाटील यांचे राजकीय भवितव्य उज्वल असल्याने सूडबुद्धीने त्यांना या प्रकरणात गोवल्याचे मत आप्पांनी व्यक्त केले.

# सोलापूर येथील रिपाइं च्या संविधान सन्मान मेळाव्यास अक्कलकोट तालुक्यातून हजारोंच्या संख्येने उपस्थित रहावे : सैदप्पा झळकी




अक्कलकोट/प्रतिनिधीः रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडिया (आठवले गट) च्या संविधान सन्मान मेळाव्यास तालुक्यातून हजारोंच्या संख्येने उपस्थित रहावे असे आव्हाहन रिपाइं जिल्हा उपाध्यक्ष सैदप्पा झळकी यांनी केली आहे. अक्कलकोट तालुका कार्यकारिणीची नियोजन बैठक अक्कलकोट तालुकाध्यक्ष अविनाश मडीखांबे यांच्या अध्यक्षतेखाली पार पाडली.याप्रसंगी सैदप्पा झळकी यांनी बोलताना म्हणाले की,दि.२५ फेब्रुवारी रोजी सोलापूर येथील नॉर्थकोट मैदान येथे रिपब्लिकन पक्षाचा संविधान सन्मान जिल्हा मेळावा केंद्रीय राज्यमंत्री तथा रिपाइं राष्ट्रीय अध्यक्ष डॉ रामदास आठवले यांच्या मार्ग दर्शनाखाली व महाराष्ट्र प्रदेशाध्यक्ष राजाभाऊ सरवदे यांच्या अध्यक्षतेखाली संपन्न होणार आहे.तरी मोठ्या संख्येने उपस्थित राहण्याचे आव्हाहन श्री झळकी यांनी केली आहे.

या मेळाव्यास आक्कलकोट तालुक्यातून बहुसंख्य हजारो कार्यकर्ते उपस्थित राहण्यासाठी नियोजनाची बैठक आक्कलकोट येथील मैंदर्गी रोड वरील भक्त निवास या ठिकाणी संपन्न झाले असून या बैठकीत रिपाइं तालुका अध्यक्ष अविनाश मडिखांबे,जिल्हा उपाध्यक्ष सैदप्प झळकी,युवक जिल्हा सरचिटणीस विजयकुमार पोतेनवरू,तालुका सचिव राजु भगळे, शहर अध्यक्ष अजय मुकणार, राजु बोरगाव,चंद्रकांत गायकवाड व सूरज सोनके मंजू बनसोडे,आदीनी आपले मनोगत व्यक्त केले.

सदर बैठकीत सोलापूर लोकसभा मतदार संघातून राजाभाऊ सरवदे यांना उमदवारी दिली तरच आपण मित्र पक्षाच काम करावे अन्यथा वेगळा विचार करावे अशा इशारा अनेक कार्यकर्ते मनोगत व्यक्त करत होती. पदाधिकारी व कार्यकर्ते ही या विषयावर शिक्का मोर्तब केली आहे. यावेळी रिपाइ तालुका संघटन सचिव अंबादास गायकवाड,तालुका कोषध्यक्ष विलास गायकवाड,शहर सरचिटणीस शुभम मडिखांबे,युवक आघाडीचे तालुका सरचिटणीस तमा धसाडे,शिरवळ शाखाचे शाखा अध्यक्ष उत्तम गायकवाड,बाबलाद गावचे सरपंच बाबू निरगुडे, सूरज सोनके,भिमा गायकवाड,सनी गायकवाड, दुधनी शहर अध्यक्ष गोरखनाथ धोडमणी,अंबादास शिंगे,सुरेश गायकवाड,रवी सलगरे,सचिन बनसोडे, दिनेश रुही,वालचंद सोनकांबळे,नागेश बाबर,कल्लाप्पा चव्हाण,भिमाशंकर बनसोडे,बसवराज आचगोंडा, दिलीप माळी,अनिल बाळशंकर,अक्षय बनसोडे, इस्माइल आळंद,दस्तिगिर मुजावर, राजकुमार गवळी,संजय घोडक, बाबू पवार,पमु एव्हळे,सचिन देडे सुरेश सोनकांबळे,आदी याप्रसंगी जिल्हा पदाधिकारी,

तालुका पदाधिकारी,युवक पदाधिकारी,शाखा अध्यक्ष,प्रमुख कार्यकर्ते यांनी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# महाराष्ट्र एमएसएमई डिफेन्स एक्स्पो' ला विद्यार्थी आणि उद्योजकांनी भेट द्यावी : उद्योगमंत्री उदय सामंत

पुणे : संरक्षण उत्पादन क्षेत्रात महत्त्वपूर्ण योगदान देण्यासाठी राज्यातील सूक्ष्म, लघु आणि मध्यम उद्योगांना सक्षम करणाऱ्या देशातील सर्वात मोठ्या आणि महाराष्ट्रातील अशा प्रकारच्या पहिल्या 'महाराष्ट्र एमएसएमई डिफेन्स एक्स्पो' ला महाविद्यालयीन विद्यार्थी, उद्योजक आणि नागरिकांनी भेट द्यावी, असे आवाहन राज्याचे उद्योगमंत्री उदय सामंत यांनी केले.




इंटरनॅशनल एक्झिबिशन ण्ड कन्व्हेनशन सेंटर, मोशी येथे 'महाराष्ट्र एमएसएमई डिफेन्स एक्स्पो'च्या पूर्वतयारीची श्री. सामंत यांनी पहाणी केली. यावेळी आयोजित आढावा बैठकीत ते बोलत होते. बैठकीस विभागीय आयुक्त चंद्रकांत पुलकुंडवार, पुणे महानगरपालिका आयुक्त विक्रम कुमार, पिंपरी चिंचवड महानगरपालिका आयुक्त शेखर सिंह, पीएमआरडीएचे आयुक्त राहुल महिवाल, गणेश निबे, किशोर धारिया, महाराष्ट्र राज्य औद्योगिक विकास महामंडळाचे मुख्य अभियंता प्रकाश चव्हाण, नितीन वानखेडे आदी उपस्थित होते. श्री. सामंत म्हणाले, मोशी येथील आंतरराष्ट्रीय प्रदर्शन आणि कन्व्हेन्शन सेंटर येथे २४ फेब्रुवारी पासून सुरू होणाऱ्या या प्रदर्शनात भारतीय नौसेना, लष्कर आणि वायुसेना या तिन्ही सुरक्षा दलांचा महत्वाचा सहभाग आहे. प्रदर्शनातील विविध सत्रात भारताची संरक्षण सिद्धता, विविध शस्त्रास्त्रांची निर्मिती, संरक्षण क्षेत्रातील संधी याविषयी विद्यार्थ्यांना उपयुक्त माहिती मिळणार आहे. शालेय विद्यार्थ्यांना शस्त्रास्त्रांविषयी कुतूहल असते. त्यांना आधुनिक शास्त्रासोबत संरक्षण साहित्य जवळून पाहण्याची ही संधी आहे.

संरक्षण अभियांत्रिकी उद्योगांनाही प्रदर्शनात सहभागी करून घेण्यात येणार आहे. या क्षेत्राशी संबंधित स्टार्ट अप्स आणि इतर उद्योगांना उद्योग विस्तार आणि या क्षेत्रातील संधीविषयी प्रदर्शनातून माहिती मिळणार असल्याने उद्योग क्षेत्राशी निगडित प्रतिनिधींनी प्रदर्शनात सहभागी व्हावे, असे आवाहनही श्री.सामंत यांनी केले.

प्रदर्शनात सहभागी होऊ इच्छिणाऱ्या एमएसएमईना निःशुल्क दालन उपलब्ध करून द्यावे. सर्व उद्योग संघटनांच्या बैठका घेऊन त्यांना आमंत्रित करावे, असे निर्देशही त्यांनी दिले.प्रदर्शनातील चार दालनांना शिवनेरी, सिंधुदुर्ग, रायगड आणि पन्हाळा असे नाव देण्यात येणार आहे. संपूर्ण परिसरात छत्रपती शिवाजी महाराजांच्या गडकिल्लयांच्या संरक्षण सिद्धतेची संकल्पना प्रदर्शित करण्यात येणार आहे. अभियांत्रिकी महाविद्यालयातील १ लाखाहून अधिक विद्यार्थी या प्रदर्शनाला भेट देणार आहे. त्यांना १ हजार प्रकारचे तंत्रज्ञान पाहण्यासोबत भारतीय सुरक्षा दलाच्या वरीष्ठ अधिकाऱ्यांचे मार्गदर्शन मिळणार आहे, अशी माहिती यावेळी देण्यात आली.बैठकीस विविध विभागांचे अधिकारी उपस्थित होते.

# माघी यात्रेत दर्शनरांगेतील भाविकांना अत्याधुनिक सोई सुविधा; मंदिर समितीने घेतली आढावा बैठक

पंढरपूर/प्रतिनिधी : २० जानेवारी, २०२४ रोजी जया एकादशी म्हणजेच माघ यात्रा संपन्न होत आहे. यात्रेच्या अनुषंगाने भाविकांना देण्यात येणा–या सोई सुविधेचा आढावा घेण्यात आला. तसेच दर्शन रांगेची पाहणी केली. त्यामध्ये प्रामुख्याने भाविकांना सुलभ व जलद दर्शन उपलब्ध करून देण्याच्या दृष्टीने आवश्यक उपाययोजना राबविणे, चांगली स्वच्छता व्यवस्था, अन्नदान, आरोग्य व्यवस्था व इतर अनुषंगिक सोयी सुविधां उपलब्ध करून देण्याचे निर्देश सह अध्यक्ष श्री गहिनीनाथ महाराज औसेकर यांनी दिले.

तसेच पत्राशेड येथे अन्नछत्राचा शुभारंभ श्री गहिनीनाथ महाराज औसेकर यांच्या शुभहस्ते व सदस्य श्रीमती शकुंतला नडगिरे, ह.भ.प. ज्ञानेश्र्वर देशमुख जळगावकर, कार्यकारी अधिकारी श्री राजेन्द्र शेळके, व्यवस्थापक श्री बालाजी पुदलवाड व विभाग प्रमुख श्री बलभीम पावले यांच्या प्रमुख उपस्थितीत करण्यात आला. मंदिर समितीची रविवार, दि. १८ फेब्रुवारी, २०२४ रोजी स. ११.०० वा. श्री.विठ्ठल रूक्मिणी भक्तनिवास, पंढरपूर येथे श्री.गहिनीनाथ महाराज औसेकर यांच्या अध्यक्षतेखाली सभा संपन्न झाली. या सभेत माघ यात्रा २०२४ च्या नियोजनाचा तसेच श्री.विठ्ठल रूक्मिणी मंदिर संवर्धन व जिर्णोद्वार कामाचा आढावा घेण्यात आला. याशिवाय, पंढरपूर शहर व परिसरातील २४ परिवार देवतांच्या मंदिराचे संवर्धन व जिर्णोद्वार आराखडा तयार करून पुरातत्व विभागा मार्फत ई निविदा राबविण्यात आली होती. त्यामध्ये मे.सवानी हेरीटेज कॉन्झर्वेशन प्रा.लि., मुंबई यांची ई निविदा (रू.१२,८४,८९,०९२/–) मंजुर करण्यात आली आहे. यामध्ये एकविरादेवी, खंडोबा, सोमेश्र्वर, रिध्दि सिध्दी, लक्ष्मण पाटील, विष्णूपद, नारदमुनी, लखूबाई, अंबाबाई, व्यास नारायण, पद्मावती, यमाई तुकाई, त्र्यंबकेश्र्वर, काळभैरव नवग्रह, शाकंभरीदेवी, नरसोबा, मारूतीचा पार, काळा मारूती, यल्लमादेवी, रामबागचा मारूती, तांबडा मारूती, रोकडोबा, सटवाई इत्यादी देवतांच्या मंदिराचा समावेश आहे. या मंदिरांच्या विकासात्मक कामाचा लवकरच शुभारंभ करण्यात येत आहे.



या सभेस सह अध्यक्ष श्री.गहिनीनाथ महाराज औसेकर, सदस्या श्रीमती शकुंतला नडगिरे, श्री.संभाजी शिंदे, ह.भ.प.ज्ञानेश्र्वर देशमुख (जळगांवकर), ह.भ.प.प्रकाश जवंजाळ हे समक्ष तर, डॉ.दिनेशकुमार कदम, श्री.भास्करगिरी बाबा, श्री.अतुलशास्त्री भगरे गुरूजी हे दुरदृष्य प्रणालीद्वारे तसेच कार्यकारी अधिकारी श्री.राजेंद्र शेळके, व्यवस्थापक श्री.बालाजी पुदलवाड व सर्व खात्याचे विभाग प्रमुख उपस्थित होते.

श्री.विठ्ठल रूक्मिणी भक्तनिवास येथील बी, सी व डी विंग इमारतीचा तिसरा मजला वातानुकुलित करणे, कर्मचारी अनुकंपा नियमावलीस व व्यवस्थापनावरील खर्च दान निधीच्या एकूण उत्पन्नाच्या १० वरून २० टक्के करण्यास धर्मादाय आयुक्त यांनी मंजुरी दिल्यानुसार शासनास अंतिम मंजुरीसाठी सादर करणे, कर्मचारी सेवानिवृत्तीचे वय ५८ वरून ६० वर्षे करण्याबाबत धर्मादाय आयुक्तांस प्रस्ताव सादर करण्याचा निर्णय घेण्यात आला. याशिवाय, माघ एकादशीला श्री.विठ्ठल व श्री.रूक्मिणीमातेची नित्यपुजा अनुक्रमे सदस्य ह.भ.प. ज्ञानेश्र्वर देशमुख जळगावकर व श्रीमती शकुंतला नडगिरे यांच्या शुभहस्ते संपन्न होणार आहे. त्यादिवशी मंदिरात आकर्षक व नयनरम्य अशी फुलांची आरास करण्यात येत आहे.

तसेच पंढरपूरचे तहसिलदार श्री.सचिन लंगुटे, नगरपरिषद मुख्याधिकारी श्री.प्रशांत जाधव, शहर पोलीस ठाण्याचे पोलीस निरीक्षक श्री.विश्र्वजित घोडके, मंदिर शाखा पोलीस निरीक्षक श्री.महेश ढवण यांच्याशी यात्रेच्या अनुषंगाने करण्यात आलेल्या नियोजनाबाबत चर्चा करण्यात आली व श्रीक्षेत्र पंढरपूर येथे नेमणूक झाल्याबद्दल मंदिर समितीच्या वतीने मा.सह अध्यक्ष व सदस्य महोदयांच्या शुभहस्ते सत्कार करण्यात आल्याची माहिती कार्यकारी अधिकारी श्री.राजेंद्र शेळके यांनी दिली.

# शाळा महाविद्यालयातून भित्तीपत्रकांचे प्रकाशन व्हावे : मल्लीनाथ कल्याणशेट्टी

## विवेक अर्थार्जन व अग्निपंख भित्तिपत्रकाचे झाले प्रकाशन

कला विभागाच्या वतीने विवेक भित्तीपत्रकाचे प्रकाशन करण्यात आले. त्याचे संपादन प्रा. तुकाराम शिंदे यांनी केले, वाणिज्य विभागाचे अर्थार्जन भित्तीपत्रकाचे संपादन प्रा. शीतल फुटाणे तर विज्ञान विभागाच्या अग्निपंख या भित्तीपत्रकांचे संपादन प्रा. मनीषा शिंदे यांनी केले. या भित्तीपत्रकात कथा कविता चारोळी, राज्य व केंद्र सरकारच्या बजेट विश्लेषण तसेच विज्ञान विषयक घडामोडी आदींचा समावेश आहे.



अक्कलकोट/प्रतिनिधीः भ्रमणध्वनी, इंटरनेट मुळे लेखन कला, चित्रकला यांचा विकास थांबला आहे. त्यामुळे विद्यार्थ्यांच्या गुणवत्तेस बाधा पोहचत आहे. त्यासाठी शिक्षकांनी शाळा महाविद्यालयातून भित्तिपत्रकांचे प्रकाशन करावे असे मत मल्लिनाथ कल्याणशेट्टी यांनी व्यक्त केले. महर्षी विवेकानंद समाजकल्याण संस्थेच्या मातोश्री गुरुबसव्वा कल्याणशेट्टी महाविद्यालयात विवेक, अर्थार्जन, अग्निपंख या भित्तिपत्रकांचे प्रकाशन केल्यानंतर मार्गदर्शन करताना ते बोलत होते. अध्यक्ष स्थानी विज्ञान विभाग प्रमुख पूनम कोक्कळगी या होत्या. व्यासपीठावर प्राचार्य. डॉ. राजेंद्रसिंह लोखंडे, प्राचार्य मलकप्पा भरमशेट्टी उपस्थित होते. पुढे ते म्हणाले कि विद्यार्थ्यांकडून लेख, कथा, कविता, लिहून घेण्याची जबाबदारी शिक्षकांची असते. त्यांना प्रोत्साहन देऊन त्यांच्यातील प्रतिभेस जाणीवपूर्वक चालना देण्याचा शिक्षकांनी प्रयत्न केला पाहिजे.

पूनम कोक्कळगी म्हणाल्या कि शिक्षकांनी विद्यार्थ्यांमधील सुप्त गुण ओळखावेत. त्यांच्यातील सृजन शक्ती जागरूत करावी. उपक्रम आयोजित करावेत. त्यामुळे त्यांचा सर्वांगीण होण्यास मदत होईल. कार्यक्रमाचे प्रास्ताविक प्राचार्य. डॉ. राजेंद्रसिंह लोखंडे यांनी केले. सूत्रसंचालन प्रा. डॉ. शीतल झिंगाडे यांनी केले तर आभार गुरूशांत हपाळे यांनी मानले. यशस्विते साठी प्रा. राजशेखर पवार, प्रा. तुकाराम शिंदे, डॉ. बाळासाहेब पाटील, प्रा. विद्या बिराजदार, प्रा. शीतल फुटाणे, प्रा. मनीषा शिंदे, प्रा. विद्याश्री वाले, विठ्ठल एलगर, महेश जोगदे यांनी प्रयत्न केले.

# शिवजयंती पूर्वसंध्येला शहापूर तालुक्यातील किल्ले माहुली पायथ्याशी शिवाजी महाराज यांना अभिवादन आणि मानवंदना







शहापूर : प्रफुल्ल शेवाळे : महाराष्टाचे आराध्य दैवत तथा मराठा साम्राज्याचे संस्थापक छत्रपती शिवाजी महाराज यांची ३९४ वी जयंती १९फेब्रुवारी २०२४ रोजी साजरी होत आहे. वैभव, शौर्य, दया आणि औदार्य यांचं प्रतीक असलेले छत्रपती शिवाजी महाराज यांची जयंती १८७० पासून सुरु करण्यात आली. महात्मा फुले यांनी सर्व प्रथम पुण्यात शिवजयंती उत्सव साजरा करण्यास सुरुवात केली.. १९ फेब्रुवारी च्या शिवजयंती उत्साहाचे औचित्य साधत शहापूर तालुक्यातील राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी आणि तालुक्यातील शालेय विद्यार्थी शिवजयंती च्या पूर्व संध्येला जिजाऊ मातेच्या पदस्पर्शने पावन झालेल्या माऊली किल्ल्याच्या पायथ्याशी शिवाजी महाराजांना मानवंदना देण्यात आली.. पायथ्याशी साफ सफाई मोहीम हाथी घेत शिवाजी महाराज यांच्या जीवन पटावर निवडक भाषणे सादर करण्यात आली.. यात शालेय विद्यार्थीनी पारंपरिक वेशात येऊन शिवरायांबद्दल आपला आदरभाव व्यक्त करीत होत्या.. आपल्या महाराष्ट्र राज्यातील आपल्या राजाचा जयंती उत्सव हा राज्यापुरता मर्यादित नसून पूर्ण देशभर तसेच संपूर्ण जगाच्या कानाकोपऱ्यात हा उत्सव साजरा केला जातो असे आशयाचे उदगार राष्ट्रवादी काँग्रेस ठाणे जिल्हा ग्रामीण प्रवक्ते मुकेश दामोदरे यांनी प्रस्थापित केले आहेत तर शिवाजी महाराज यांचे आचार विचार पुढे नेऊन आपल्या अखंड हिंदुस्थानचा स्वराज्याचा लढा अबाधित ठेवला पाहिजे अशा भावना राष्ट्रवादी काँग्रेस महिला जिल्हाअध्यक्षा कल्पना तारमळे यांनी व्यक्त केल्या आहेत.. शिवाजी महाराज यांच्या जयघोषाने माहुली किल्ले पायथा मंत्रमुग्ध होताना दिसत होता.. कार्यक्रमला शहापूर तालुका अध्यक्ष डॉ. मनोहर सासे, सोशल मीडिया चे प्रफुल्ल शेवाळे, कांता तारमळे, सतीश ठाकरे, राष्ट्रवादी चे युवा नेते करण दरोडा, वैभव तारमळे, दिनेश चंदे, अभय वेखंडे, गणेश पंडित तसेच महिला पदाधिकारी, युवक वर्ग, शालेय विद्यार्थीनी आणि राष्ट्रवादी काँग्रेस चे विविध पदाधिकारी आणि कार्यकर्ते उपस्थिती होते.

# बोलेरो मधून दारू ची वाहतुक करणाऱ्या वाहनचालकाला अटक मुद्देमाल ही केला जप्त



सोलापूर/प्रतिनिधीः बोलेरो मधून दारू ची वाहतुक करणाऱ्या वाहनचालकाला अटक करण्यात आली असून मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे राज्य उत्पादन शुल्क पंढरपूर विभागाने ही कामगिरी केली आहे राज्य उत्पादन शुल्क विभागाच्या पंढरपूर पथकाने रविवारी पंढरपूर तालुक्यात चारचाकी वाहनातून देशी विदेशी दारू तर दुचाकीवरून वाहतूक होणारी हातभट्टी दारू जप्त केली.

सविस्तर वृत्त असे की, रविवारी दुपारच्या सुमारास राज्य उत्पादन शुल्क विभागाचे पंढरपूर निरीक्षक पंकज कुंभार यांनी त्यांच्या पथकासह पंढरपूर तालुक्यातील भाळवणी ते पिराची कुरोली रोडवर देशी-विदेशी दारूची वाहतूक होत असल्याच्या मिळालेल्या खात्रीलायक बातमी नुसार सापळा रचला. मिळालेल्या बातमीनुसार त्यांनी महिंद्रा बोलेरो क्रमांक चक्४५ - ८५७९ या चारचाकी वाहनाला थांबवून त्याची झडती घेतली असता वाहनात देशी दारूच्या १८० मिली क्षमतेच्या १४४ बाटल्या व मॅकडॉवेल नंबर वन व्हिस्की विदेशी दारूच्या १८० मिलीच्या ४८ बाटल्या असा सतरा हजार दोनशे अंशी रुपये किंमतीचा दारू साठा आढळून आला. या कारवाईदरम्यान वाहनचालक पांडुरंग भीमराव कारंडे, वय ४६ वर्षे, राहणार महीम (ता. सांगोला) या इसमास अटक करण्यात आली. या कारवाईत वाहनाच्या किमतीसह पथकाने चार लाख २४ हजार ४८० रुपये किमतीचा मुद्देमाल हस्तगत केला. एका अन्य कारवाईत दुय्यम निरीक्षक पंढरपूर श्रद्धा गडदे यांच्या पथकाने पंढरपूर तालुक्यातील सोनके गावाच्या हद्दीत पंढरपूर-कराड रोडवर सत्यवान मारुती बागल, वय ५२ वर्षे , राहणार पळशी (ता. पंढरपूर) या इसमास दुचाकीवरून दोन रबरी ट्यूब मध्ये १६० लिटर हातभट्टी दारूची वाहतूक करताना पकडले. त्याच्या ताब्यातून ७३ हजार दोनशे रुपये किमतीचा मुद्देमाल जप्त करण्यात आला. ही कारवाई राज्य उत्पादन शुल्क विभागाचे अधीक्षक नितीन धार्मिक, उपअधीक्षक संजय पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली निरीक्षक पंकज कुंभार, दुय्यम निरीक्षक श्रद्धा गडदे, जवान विजयकुमार शेळके, प्रकाश सावंत व वाहन चालक रामचंद्र मदने यांच्या पथकाने पार पाडली.

**सर्व नागरिकांना आवाहन करण्यात येते की, त्यांच्या परिसरात हातभट्टी दारू निर्मिती, विक्री तसेच अवैध देशी दारू, विदेशी दारू, पराराज्यातील दारू विक्री किंवा वाहतूक होत असल्यास त्याची माहिती राज्य उत्पादन शुल्क विभागाला द्यावी. माहिती देणाऱ्याचे नाव गोपनीय ठेवण्यात येईल असे अधीक्षक नितिन धार्मिक यांनी सांगितले आहे.**

# संविधान वाचवण्यासाठी रिपाईच्या झेंड्याखाली सर्वांनी संघटित व्हावे : डॉ. राजेंद्र गवई यांचे आवाहन





सोलापूर/प्रतिनिधीः केंद्रातील जातीवादी मोदी सरकार जनतेच्या मूलभूत हक्कावर गदा आणत असून त्यांचा 'हम करे सो कायदा रुपी' कारभार उधळून लावण्यासाठी तसेच भारतीय संविधानाला वाचवण्यासाठी रिपाईच्या झेंड्याखाली सर्वांनी संघटित होण्याची गरज आहे तसेच आगामी निवडणुकीत काँग्रेस व जातीवादी पक्षांना धडा शिकवण्यासाठी ताकद दाखवून द्या असे आवाहन रिपाईचे राष्ट्रीय महासचिव डॉक्टर राजेंद्र गवई यांनी केले. ते होटगी रोडवरील हत्तुरे सभागृहात रविवारी आयोजित रिपाईच्या 'संविधान बचाव देश बचाव' या विषयावरील मेळाव्यात बोलत होते. विचार मंचावर राष्ट्रीय कोषाध्यक्ष रामराव दाभाडे, प्रदेशाध्यक्ष सुबोधजी वाघमोडे आदी मान्यवर उपस्थित होते.प्रारंभी राष्ट्रपुरुषांच्या प्रतिमेचे पूजन करून विनम्र अभिवादन करण्यात आले. प्रास्ताविक माणिक आठवले यांनी केले. राष्ट्रीय कोषाध्यक्ष रामराव दाभाडे यांनी आपल्या मार्गदर्शनपर भाषणात रिपाई जिवंत असेपर्यंत भारतीय संविधानाला कोणीच हात लावू शकत नाही असा इशारा दिला. प्रदेशाध्यक्ष सुबोधजी वाघमोडे यांनी मनोवादी भाजप संविधान बदलण्याची भाषा करीत असून त्यांचे कटकारस्थान थोपवण्यासाठी रिपाईच्या पाठीशी उभे राहावे असे आवाहन त्यांनी केले.

याप्रसंगी हेमंत भोसले,किशोर वाघमोडे,मिलिंद मोकळे,जाहीर खान, पांडुरंग कांबळे, फैसल सालार,गणेश बोद्दु,धर्मा माने, सिकंदर शेख, सलीम शेख, जकाप्पा कांबळे ,पी.एस कांबळे, वंदना शेट्टी, मेजर सुखदेव साबळे, अखिलेश माने ,किशोर वाघमारे, प्राध्यापक राजकुमार सोनवणे, संगीता क्षीरसागर,नसरीन शेख, पूनम मोरे, राजश्री साबळे, आम्रपाली तीर्थे, रावसाहेब प्रक्षाळे, रफिक शेख बिराजदार संदीप ससाणे इमरान शेख, इब्राहिम शेख,समीर मुजावर, मारुती सोनवणे,सलीम मुजावर,सलीम मुल्ला आदींसह मान्यवर रिपाईचे पदाधिकारी व कार्यकर्ते बहुसंख्येने उपस्थित होते.

# सोलापुरातील दुचाकी चालकांनो रहा सावधान!

## सीसीटीव्ही कॅमेऱ्यावरून केला जात आहे दंड




सोलापूर/महेश गायकवाड : सोलापूरात सद्या दुचाकी वाहनांवर मोठ्या प्रमाणात कारवाई केली जात आहे. सोलापूर वाहतूक शाखेकडून कारवाईची मोहीम उघडण्यात आली असून सोलापुरातील सर्वच ठिकाणी ही मोहीम राबविली जात आहे, त्यामुळे

सोलापुरातील दुचाकी चालकांनो रहा सावधान! सीसीटीव्ही कॅमेऱ्यावरून केला जात आहे दंड असा इशाराच देण्यात आला आहे.स्मार्ट सिटी योजनेतून शहरात १३६ ठिकाणी सीसीटीव्ही कॅमेरे बसवण्यात आलेले आहेत. या कॅमेऱ्यावरुण ट्रिपलसीट, मोबाईलवर बोलताना दंड लावण्यात येत आहे.

सोलापूर शहरात दुचाकी वाहनांचे प्रमाण वाढले आहे. यात सर्वाधिक तरुण, शाळकरी व कॉलेजची मुले दुचाकी चालवताना मोठ्या प्रमाणावर आढळून येत आहेत. दुचाकीवर ट्रिपलसीट, मोबाईल वरून बोलताना सीसी कॅमेऱ्याने टिपलेल्या चित्रीकरणावरून वाहतूक पोलिसांनी दंडात्मक कारवाई सुरू केली आहे. शहरात महत्त्वाच्या १३६ चौकात बसविलेले हे सीसीटीव्ही कॅमेरे वाहतूक पोलिसांच्या यंत्रणेसाठी जोडलेले आहेत. या ठिकाणी बसलेले वाहतूक पोलीसाकडून वाहनधारकांवर लक्ष ठेवून वाहतुकीच्या नियमांचे उल्लंघन करणाऱ्यावर ई-चलांनद्वारे दंडात्मक कारवाई करण्यात येत आहे. १५ फेब्रुवारी रोजी या सीसीटीव्ही कॅमेराद्वारे मोबाईल टॉकिंगचे ५३, ट्रिपल सीटचे ३३ असे एकूण ८६ ई-चलनाचे केसेस करण्यात आले आहेत. यात प्रामुख्याने रामलाल चौक, अशोक चौक, सात रस्ता, चार हुतात्मा चौक या भागातून जाणाऱ्या दुचाकीस्वारांना या कारवाईचा दणका बसला आहे. त्यामुळे यापुढे शहरातील महत्त्वाच्या चौकातून जाताना वाहतुकीच्या नियमांचे उल्लंघन कराल तर दंडास पात्र ठराल, असा इशारा वाहतूक पोलिसांनी दिला आहे.

# दर्शनाळ येथे बसवेश्वर महाराज यांचे प्रवचन




दर्शनाळ/देविदास मानेः अक्कलकोट तालुक्यातील दर्शनाळ येथे सध्याच्या काळात मानव भौतिक सुखाच्या मागे लागला असून यामुळे प्रत्येकाचे शारीरिक व मानसिक स्वास्थ्य बिघडत चालली आहे निरोगी जीवन जगण्यासाठी ईश्र्वराचे नामस्मरण करणे गरजेचे आहे असे प्रतिपादन दिंडूर ( दक्षिण सोलापूर) येथील हत्तीकेर गुड्डचे श्री बसवेश्र्वर महाराज यांनी केले. माघी वारी निमित्ताने अक्कलकोट तालुक्यातील दर्शनाळ येथे श्री बसवेश्र्वर महाराज यांचे प्रवचन आयोजित करण्यात आले होते यावेळी ते बोलत होते .

प्रथम सिंदगाव नांदगाव येथील दिंडीचे सुधाकर बिराजदार.मनोज बिराजदार चिदानंद सपळे मल्लिनाथ हांडगे महेश करपे यांच्या हस्ते स्वागत करण्यात आले यावेळी बोलताना ते पुढे म्हणाले महाराष्ट्राला साधुसंतांची परंपरा लाभलेली आहे संत तुकाराम नामदेव एकनाथ सावता माळी आदींनी भजन भारुड किर्तन प्रवचन आदींच्या माध्यमातून समाज प्रबोधनाचे कार्य केले. जनसेवेचे कार्य करीत असताना संतांना अनेक संकटांचा सामना करावा लागला . प्रतेकानी संसाराच्या व्यापातून थोडा वेळ काढून ध्यानधारणा करावे यामुळे माणसाला आत्मज्ञान प्राप्त होते ध्यान नामस्मरण हे मन बुद्धी चार्जिंग होण्याचे केंद्र आहे ध्यान केल्याने चांगले काम करण्याची प्रेरणा मिळते भाव सात्विक होतो युवकांनी व्यसनाच्या विळख्यातून मुक्त होऊन जीवनात उच्च पदावर कार्यरत होण्यासाठी जिद्द चिकाटी आणि परिश्रम आदी गुणांचा अवलंब करावा . विठ्ठलाचे भजन भारुड किर्तन श्रवण केल्याने राग लोभ मोह मत्सर द्वेष आदी दुर्गुण विकारांवर मात करता येते. प्रवचनाला संगीताची साथ दर्शनाळ येथील भजन मंडळाने केली यावेळी सिंदगाव नांदगाव येथील दिंडीचे प्रमुख भोजू मामा धोंडप्पा सपळे अर्जुन गाडेकर विठ्ठल सुतार कृष्णात काळे अपलू सपळे राजकुमार बिराजदार शिवाजी गायकवाड विजय स्वामी, मल्लिनाथ व्हनमुगे यांच्यासह दर्शनाळ परिसरातील भाविक उपस्थित होते महाप्रसाद वाटपाने कार्यक्रमाची सांगता झाली.

# अयोध्येत सोडलेला चहा २१वर्षानंतर अयोध्येतच घेतला

## कायसेवक समाधान कापसे यांची रामनिष्ठा




निफाड : निफाड कारसेवक समाधान कापसे हे भारत माता आश्रमाचे संस्थापक जनेश्र्वर महाराज यांच्याकडे अयोध्येत २१ वर्षांपूर्वी कारसेवेनिमित्त आश्रमात गेले होते. तेथे त्यांनी राममंदिराची मुहूर्तमेढ होऊन रामलल्लाला बघेन तेव्हाच चहा घेईल आणि डोक्यावरची शेंडी काढीन, अशी प्रतिज्ञा केली होती. त्यानुसार कापसे यांनी २१ वर्षांनंतर पुन्हा अयोध्येत जाऊन जनेश्र्वर महाराजांच्या हस्ते शरयू नदीत पूजा करून डोक्याची शेंडी कापली. तसेच संकल्प पूर्ण करून शरयू नदीचे हातावर पाणी घेऊन श्रीरामलल्लाचे अयोध्या धामचे दर्शन घेतले व महाराज जनेश्र्वर यांच्या हस्ते चहा घेतला. कापसे यांनी संकल्प पूर्ण झाला, या हर्षात जय श्रीराम म्हणत प्रसन्न मुद्रेने याची देही याची डोळा होऊन चहा घेतला. यावेळी विश्र्व हिंदू परिषद, बजरंग दल नाशिक जिल्हा मंत्री देविदास वारुंगसे, सहमंत्री राहुल सोनकुल, स्वरूपानंद बोरगुडे, संतोष आरोटे, सोमनाथ वाघचौरे, रवी पितळे, रामेशर लोकरे, निवृत्ती मोहिते, रवी फडे, किरण कोटकर, संजय सोनवणे, विनोद बोरगुडे, पद्माकर दाते, जितेंद्र जाधव, गणेश शिंदे यांनी जयश्री रामचा जय घोष करत संकल्प पूर्ण झाल्याने महाराजांच्या हस्ते चहा घेतला.